॥ बहुजन हिताय । बहुजन सुखाय ॥

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि २२ फेब्रुवारी २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ८ वा

## सांगोला नगर परिषदेमार्फत व महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन





सांगोला : स्वच्छ सर्वेक्षण २०२६' व 'माझी वसुंधरा ६.०' अभियानांतर्गत दरवर्षीप्रमाणे ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सांगोला नगर परिषदेमार्फत विविध स्पर्धा तसेच होममिनिस्टर – खेळ पैठणीचा' यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता महिलांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता पाककला स्पर्धा तसेच दुपारी २.०० वाजता ग्रुप डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

पाक कला स्पर्धेचा विषय मूग व हुलगा यापासून बनवलेल्या चविष्ट ,पौष्टिक, रुचकर पदार्थ तसेच पाक कलेतील स्पर्धेतील प्रत्येकी पहिल्या तीन क्रमांकांना रक्कम रुपये ५००१ ,३००१,२००१ प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह ग्रुप डान्स स्पर्धेचा विषय भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब / सामाजिक संदेश ग्रुप डान्स स्पर्धेतील प्रत्येकी पहिल्या तीन क्रमांकांना रक्कम रुपये ७००१, ५००१, ३००१ प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह तसेच उत्तेजनार्थ बक्षीसही दिले जाणार आहेत. दिनांक ९ मार्च २०२६ रोजी 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा', लकी ड्रॉ व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन दुपारी १२ वाजता करण्यात आले आहे.

वरील सर्व कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन ( टाऊन हॉल ) येथे होणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ७९७२१००३६५, ७७०९०९२२४१ या नंबर वर नाव नोंदणी करावी .तरी सर्व महिलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन सहभाग नोंदवावा.

## वाढेगाव येथे को. प. बंधाऱ्यात सापडला तब्बल १२ किलो वजनाचा दुर्मीळ चंदेरी मासा



सांगोला : येथील को. प. बंधाऱ्याजवळील नदीपात्रात तब्बल १२ किलो वजनाचा चंदेरी जातीचा मासा सापडला. एवढ्या मोठ्या आकाराचा मासा प्रथमच आढळल्याची माहिती स्थानिक मच्छीमारांनी दिली. वाढेगाव परिसरात माण, कोरडा आणि अफ्रुका या तीन नद्यांचा संगम असून संगमस्थळी को. प. बंधारा आहे. या ठिकाणचे नदीपात्र खोल व रुंद असल्यामुळे विविध जातींचे मासे येथे आढळतात. गतवर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे उन्हाळ्यातही नदीपात्रात पाणी साचले होते. दूरवरून आलेल्या पाण्यासोबत विविध प्रजातींचे मासे मोठ्या प्रमाणात येथे दाखल झाले होते.

सध्या नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी होत असल्याने मोठ्या आकाराचे मासे सहज दिसून येत आहेत. शुक्रवारी सकाळी नियमितप्रमाणे जाळी टाकून मासेमारी करत असताना एका जाळ्यात मोठ्या वजनाचा चंदेरी मासा अडकलेला आढळला. मच्छीमारांनी तो काळजीपूर्वक बाहेर काढला. नदीपात्र स्वच्छ असल्याने रव, गासकापर, निरगील, कटला, सपरनेस, गुगळी, कटरना, चिलाप आदी विविध प्रजाती येथे आढळतात. १२ किलो वजनाचा चंदेरी मासा सापडल्याची बातमी पसरताच तो पाहण्यासाठी नागरिकांनी नदीपात्र परिसरात गर्दी केली.

# सांगोला येथे शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न



सांगोला : छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणा देत, सांगोला शहर आणि तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी व्हावी या दृष्टीने शिवप्रेमी उत्सव मंडळ सांगोला यांच्या वतीने मोठे जंगी नियोजन करण्यात आले आहे . त्यानुसार विविध कार्यक्रम व उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार दि. १८ फेब्रुवारी रोजी सायं. ५ वाजता महात्मा फुले पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महिला रॅली काढण्यात आली होती. रात्री ८ वाजता शिवशाहीरांचा कार्यक्रम व शिवतीर्थावर पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी पहाटे ६ वाजता शिवरायांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.सकाळी ८ वाजता छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक व पुष्पहार अर्पण करण्यात आला.त्यानंतर सांगोला शहर व तालुक्यातील गुणवंत खेळाडूंचा शिवप्रेमी मंडळांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.कार्यक्रमानंतर दिवसभर शिवभक्तांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच महाराजांच्या स्मारकास आकर्षक एलईडी लाइटिंग करून परिसर उजळून निघाला होता.

यावेळी मा.आ.शहाजीबापू पाटील, नगराध्यक्ष आनंदा माने, डॉ.निकीताताई बाबासाहेब देशमुख, यशराजे साळुंखे-पाटील, तहसीलदार बाळूताई भागवत, मुख्याधिकारी सुधीर गवळी यांच्यासह नगरपालिकेचे नगरसेवक, जि.प.सदस्य, पं.स.सदस्य यांच्यासह विविध राजकीय सामाजिक पक्षाचे पदाधिकारी, डॉक्टर , पत्रकार, उद्योजक, वकील मंडळी, तसेच शिवप्रेमी उपस्थित होते.

सांगोला शहर व तालुक्यातील विविध मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पवृष्टी अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहरातील प्रमुख मिरवणूक मार्गावरून पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रा दरम्यान सर्व महापुरुष यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत शहरात पदयात्रा काढण्यात आली.

यावेळी विशेष आकर्षण म्हणून, घोडे, हालगी, नाशिक ढोल, उंट, मावळे, सबिना, मल्लखांब, दांडपट्टा आदी समावेश होते. या पदयात्रेमध्ये तरुण व महिलांनी पारंपारिक वेशभूषा परिधान केल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवप्रेमी मंडळ यांच्याकडून काढण्यात आलेल्या पद यात्रेला मोठ्या प्रमाणात शिवकन्या व शिवप्रेमींनी गर्दी केली होती.

# सांगोला तालुक्यातील बंधारे कोरडे, टंचाईचे सावट; केवळ ११% पाणीसाठा शिल्लक टेंभूच्या उन्हाळी आवर्तनाकडे शेतकऱ्यांच्या नजरा; पिके- फळबागा धोक्यात



सांगोला : उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने तालुक्यातील पाणीस्थिती चिंताजनक बनू लागली आहे. माण व कोरडा नदीवरील बंधाऱ्यांतील पाण्याची पातळी झपाट्याने घटत असून, एकूण साठवण क्षमतेच्या तुलनेत केवळ ११ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. पाटबंधारे विभागाच्या माहितीनुसार, १८ बंधाऱ्यांची १३१८.५२ दशलक्ष घनफूट साठवण क्षमता असताना सध्या फक्त ७८.६१ दशलक्ष घनफूट पाणी उपलब्ध आहे. परिणामी, शेतकरी व नागरिकांमध्ये टंचाईची भीती निर्माण झाली असून, सर्वांचे लक्ष आता टेंभू उपसा सिंचन योजनाच्या उन्हाळी आवर्तनाकडे लागले आहे.

गेल्या वर्षी दमदार पावसामुळे माण, कोरडा नदीसह ओढ्यानाल्यांना मुबलक पाणी मिळाले होते. बंधाऱ्यांतील भरघोस साठ्याच्या भरोशावर नदीकाठच्या शेतकऱ्यांनी ज्वारी, मका, ऊस, गहू, हरभरा तसेच डाळींबासारख्या नगदी- फळपिकांची मोठ्या प्रमाणात बंधारे कोरडे, सांगोल्यावर टंचाईचे सावट; केवळ ११% पाणीसाठा शिल्लक टेंभूच्या उन्हाळी आवर्तनाकडे शेतकऱ्यांच्या नजरा; पिके- फळबागा धोक्यात लागवड केली.

सध्या बहुतेक पिके जोमात असली तरी, वाढत्या उष्णतेमुळे सिंचनासाठी पाण्याचा उपसा वाढला आहे. त्यामुळे बंधाऱ्यांतील साठा दिवसेंदिवस आटत चालला आहे. दरम्यान, खवासपूर, लोटेवाडी, बलवडी, नाझरा, अनकढाळ, सांगोला, सावे, आलेगाव, मेडशिंगी हे नऊ बंधारे पूर्णतः कोरडे पडले आहेत. अनेक ठिकाणी बंधाऱ्यांचे दरवाजे काढल्याने शिल्लक पाणी वाहून गेल्याची नोंद आहे. ग्रामीण भागातील विंधन विहिरींतील पाण्याची पातळी घटली असून, पिण्याच्या पाण्याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांना पिके व फळबागा टिकवण्यासाठी पाण्याची कमतरता जाणवू लागली आहे.

डाळींबासारख्या दीर्घकालीन फळपिकांवर याचा अधिक परिणाम होण्याची शक्यता आहे. सांगोला तालुक्यातील नऊ बंधारे कोरडे ठणठणीत पडले असून उर्वरित बंधाऱ्यांतील साठाही झपाट्याने घटत असल्याने ग्रामीण भागातील विंधन विहिरींच्या पाण्याची पातळी खालावत चालली आहे. काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याबाबतही चिंता व्यक्त होऊ लागली आहे. फेब्रुवारी महिन्यातच टंचाईची चाहूल लागल्याने पुढील तीन-चार महिन्यांसाठी काटेकोर जल व्यवस्थापनाची गरज अधोरेखित होत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या आशा आता टेंभू उपसा सिंचन योजनाच्या उन्हाळी आवर्तनावर टिकून आहेत. वेळेत आवर्तन मिळाले, तरच पिके व फळबागांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पाणीसाठा आटत चालल्याने सांगोल्यातील कृषी अर्थकारणासमोर आव्हान उभे ठाकले आहे. टेंभूच्या आवर्तनातून वेळेत पाणीपुरवठा झाला, तरच पिके- फळबागांना दिलासा मिळेल, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. अन्यथा, पुढील काही महिन्यांत पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सांगोला तालुक्यातील चिंचोली, अचकदाणी, जवळा, घेरडी, हंगिरगे या पाच तलावांची साठवण क्षमता ३६०.५६ दशलक्ष घनफूट इतकी आहे. सध्या या तलावांमध्ये १९९.४६ (५३ टक्के) दशलक्ष घनफूट इतका पाणीसाठा शिल्लक आहे. सध्या चिंचोली तलावात ६४.९१ दशलक्ष घनफूट, अचकदाणी तलावात १९.९९ दशलक्ष घनफूट, जवळा ३०.३८ दशलक्ष घनफूट, घेरडी ७७.१२ दशलक्ष घनफूट, हंगिरगे ७.०६ दशलक्ष घनफूट इतका पाणीसाठा आहे.

# मुक्त विचार

## विचारधन



शत्रू कितीही बलाढ्य असला तरी आपल्या हेतू आणि उत्साहानेच त्याचा पराभव होऊ शकतो.

-छत्रपती शिवाजी महाराज

# छत्रपती शिवाजी महाराज-एक धीरोदात्त राजा

छत्रपती शिवाजी महाराज हे तीन शब्द नुसते उच्चारले की सर्रकन अंगावर काटा उभा रहातो.महाराष्ट्रातच नाही,भारत देशातच नाही तर संपुर्ण विश्वात अतुलनीय्,अद्बितीय्,अलौकीक असा दुसरा शिवाजी राजा सापडण अवघड आहे.जगातल्या साहसी,पराक्रमी आणि सफल अशा राजांमध्ये शिवाजी महाराजांचा समावेश करावाच लागेल.अलेक्सांडर्,नेपोलियन बोनापाट्र्,ज्युलियस सीझर वगैरे योद्ध्यांइतकेच महाराजांचे कर्तुत्व होते,नव्हे काही प्रमाणात यांच्यापेक्षा जास्तच महाराजांचे कर्तुत्व होते. कारण या राजांकडे तयार सैन्य,भुभाग होता.तर महाराजांना सर्व शुन्यातुन उभे करावयाचे होते. हे राजे आपल्या आयुष्यातील शेवटची निर्णायक लढाई हरले तसेच त्यांचा त्याच पराजीत अवस्थेत अंत झाला त्याचबरोबर त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे साम्राज्य लोप पावले. पण महाराजांनंतर त्यांचे साम्राज्य टिकले आणि वाढलेही.शिवाजी महाराज युगपुरुष होते. त्यांनी अनेक नव्या गोष्टी सुरु केल्या . देशातले पहीले 'खडे सैन्य' त्यांनी उभे केले. त्यांनी देशातल पहील नौदल उभ केल,जलदुर्ग उभारले. शिवरायांनी वतनदारी पध्दती बंद सैनिकांना,अधिकार्यांना पगार सुरु केले.शेतकर्यांच शोषण करणारी जमिनदारी पध्दत बंद करुन शेतकर्यांचा फायदा असणारी रयतवारी पध्दत आणली.

छत्रपती शिवाजी महाराज 'रयतेचा जाणता राजा' होते हे खरच.शिवराज्याभिषेकापुर्वी एक महीना आधी लिहिलेल्या एका पत्रातुन त्यांना रयतेची किती काळजी होती हे कळते. महाराज लिहितात,'कोण्ही कुणब्याचे येथील दाणे आणील्,कोण्ही भाकर्,कोण्ही गवत्,कोण्ही फाटे,कोण्ही भाजी,कोण्ही पाले.ऐसे करु लागलेत म्हणजे जे कुणबी घर धरुन जीवमात्र घेउन राहीले आहेत तेही जाउं लागतील.कितेक उपाशी मराया लागतील.म्हणजे ऐसे होईल की ,मोगल मुलकात आहे त्याहुन अधिक तळतळाट होईल.तेंव्हा रयतेची सारी बदनामी तुम्हावर येईल.हे तुम्ही बरे जाणोन बहुत यादी धरुन वर्तणुक करणे.कोण्ही....रयतेस काडीचा आजार द्यावयास गरज नाही.ज्याला जे पाहीजे,दाणा हो अगर गवत हो,अगर फाटे,भाजीपाले व वरकड विकाया येईल ते रास्त घ्यावे.बाजारात जावे रास विकत आणावे.कोण्हावरही जुलुम अगर कोण्हासी कलागती कराया गरज नाही...'यावरुनच शस्त्राच्या जोरावर सैन्य जनतेवर अत्याचार तर करणार नाही ना याची महाराजांना काळजी होती .वरील पत्राच्या उपदेशाच्या बरोबर विरुध्द वर्तन आजचे राजकारणी करतात. जनतेचा पैसा,साधनसामग्री आपलीच आहे या थाटात आजचे राजकारणी आहेत.इतकेच काय तर सामर्थ्याच्या बळावर मोक्याच्या ठीकाणी असलेल्या जमिनीही हे राजकारणी लोक बळकावतात. जनतेच्या भाजीच्या देठालाही हात लावु नका सांगणारे महाराज कुठे आणि जनतेच्या भाजीच्या देठाला सोडुन बाकी सर्वावर आपलाच हक्क आहे या थाटात वावरणारे आजचे नेते कुठे!पण आपल्या प्रत्येक सभेच्या सुरुवातीला महाराजांच्या प्रतिमेला हे लोक न चुकता हार घालतात !महाराज धार्मिक होते पण अंधश्रध्दाळु नव्हते.महाराजांचा तुकाराम महाराज,समर्थ रामदास,मौनी बाबा व इतर अनेक संतमहात्म्यांशी संबंध आला.महाराजांनी त्यांना सढळ हस्ते मदत केली.महाराजांची तुळजाभवानीवरील निस्सिम भक्ती तर आपण जाणतोच.स्वराज्यनिर्मिती करण्याची शपथही महाराजांनी रायरेश्वराच्या साक्षीने घेतली. 'हे राज्य व्हावे ही तों श्रींचीच इच्छा आहे' असेही महाराज म्हणत.पण धार्मिक असुनही महाराज अंधश्रध्दाळु नव्हते.महाराजांनी सिंधुबंदीची प्रथा मोडुन काढली.ज्या काळात समुद्रात काही मिटर जाणही पाप होत त्या काळात महाराजांची जहाजं मस्कटपर्यंत जाउन पोहोचली होती.अजुन एक उदाहरण म्हणजे राजाराम हा महाराजांचा पुत्र पालथा जन्मला तेंव्हा महाराज म्हणाले होते 'मुलगा पालथा जन्मला,बहुत उत्तम.आता तो दिल्ली पालथी घालेल.'

युध्दनिती,कुटनितीमध्ये तर महाराजांचा हात पकडण त्या काळात कुणालाही शक्य नव्हत.एक परदेशी इतिहासकार म्हणतो 'कुटनितीमध्ये महाराजांच्या करंगळीत जितक होतं तितक औरंगजेबाच्या पुर्ण शरीरात नव्हत.'आदिलशहाच्या तावडीतुन शहाजी राजांच्या सुटकेसाठी केलेले राजकारण्,जयसिंघाशी झालेल्या तहानंतर एकाच किल्ल्याला विविध नावे देउन २१ ऐवजी प्रत्यक्षात १७च किल्ले देण्याचे राजकारण्,अफजलखानाला मैदानी प्रदेश सोडुन दुर्गम्,जंगली,पर्वती प्रदेशात आणन्यासाठी केलेली कुटनिती,आग्र्याहुन सुटका करवुन घेण्यासाठी आजारी पडण्याचे केलेले नाटक्,औरंगजेबाने जिझिया कर लागु केल्यावर 'तुमच्यावर इतके दारीद्र्य आले आहे का?' असे म्हणुन त्याला हिणवण्यासाठी लिहिलेले पत्र ही महाराजांच्या कुशल बुध्दिमत्तेची ओळख करुन देणारी काही उदाहरणे! महाराजांना स्वभाषेचा अभिमान होता.म्हणुन त्यांनी रघुनाथ पंडीतांकरवी 'राज्यव्यवहारकोषा'ची निर्मिती केली.अरबी,फारसी भाषेच्या गुलामगिरीतुन मराठी भाषेची सुटका करण्यासाठी महाराजांनी तसे केले.पण आजही इंग्रजी,हिंदी भाषेच्या आक्रमणातुन आपली भाषा वाचेल का नाही याची आपल्याला चिंता वाटते.

तर अशा शिवरायांच्या महाराष्ट्रात आपण जन्मलो हे आपण आपले भाग्य मानले पाहीजे. पण एव्हढ्यावरच थांबुन उपयोग नाही.फक्त भावना,फक्त जयजयकार, फक्त मिरवणुका पुरेसे नाही. शिवाजी महाराजांना अपेक्षित असलेले गुण आपण आपल्यात अंगिकारण्याचा प्रयत्न केला पाहीजे. आपला समाज्,आपले राष्ट्र यांच्या भल्यासाठी आपण झटले पाहीजे. आपली शिवभक्ती फक्त भावना भडकवल्यावरच जागी होता कामा नये. शिवभक्ती आपल्या रक्ताचा भाग बनल्यावर भ्रष्टाचार्,नीतीमुल्यांचे हनन आपोआपच थांबेल. शिवरायांच्या ठायी असलेली चिकाटी जर आपण आपापल्या क्षेत्रात दाखवु शकलो तर सर्व क्षेत्रात आपला समाज पुढे जाईल.याबाबत समर्थांच्या काही ओळी लिहुन शेवट करतो.

**-डॉ.चिन्मय कुलकर्णी**

# क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे!

समाजात एखादी व्यक्ती, संस्था किंवा विचारधारा शांतपणे, न बोलता आपले काम करत असते तो पर्यंत ती फारशी कुणाच्या नजरेत येत नाही. पण ज्या क्षणी त्या कामाचा परिणाम दिसू लागतो, लोकांच्या जीवनात बदल घडू लागतो, प्रश्न विचारले जाऊ लागतात, तेव्हा त्या प्रभावाची पहिली किंमत द्यावी लागते बदनामीच्या स्वरूपात. कारण प्रभाव हा केवळ प्रगतीचा सूचक नसतो; तो विद्यमान सत्ताकेंद्रांना, सोयीस्कर व्यवस्थेला आणि जडलेल्या हितसंबंधांना दिलेला थेट आव्हान असतो. इतिहास साक्षी आहे, प्रभावी माणसाची बदनामी ही अपघात नसून नियोजनबद्ध प्रक्रिया असते, कारण प्रभाव म्हणजे अस्वस्थ करणारी जाणीव. प्रभावी व्यक्ती किंवा विचार समाजाला अस्वस्थ करतो. तो लोकांना प्रश्न विचारायला शिकवतो, स्वीकारलेली गुलामी नाकारायला भाग पाडतो, आणि हे असेच का? असा मूलभूत प्रश्न उभा करतो. ही अस्वस्थता अनेकांना नकोशी असते. कारण प्रश्न विचारणारा समाज म्हणजे हुकूमशाही, अन्याय आणि शोषणासाठी धोक्याची घंटा. म्हणूनच ज्या क्षणी तुमचा प्रभाव वाढू लागतो, त्या क्षणी तुमच्याविरोधात संशय निर्माण केला जातो, तुमच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उभे केले जाते, आणि हळूहळू तुमची प्रतिमा मलिन करण्याचे उद्योग सुरू होतात.

आजच्या काळात बदनामी ही तलवारीसारखी समोरून चाल करून येत नाही; ती विषासारखी हळूहळू शरीरात भिनते. कुजबुज, अफवा, अर्धसत्य, अतिशयोक्ती, जुने संदर्भ तोडून मांडणे ही बदनामीची आधुनिक हत्यारे आहेत. सोशल मीडियाच्या युगात तर बदनामीला वेग आणि व्याप्ती दोन्ही मिळाले आहेत. एका क्लिकवर तुमच्यावर आरोप, एका पोस्टवर तुमचा चारित्र्यहनन, आणि एका व्हिडिओत तुमच्या संपूर्ण कार्याचा अपलाप. सत्य तपासण्याची तसदी न घेता लोक निर्णय देतात. कारण सत्य शोधणे मेहनतीचे काम आहे, तर बदनामी स्वीकारणे सोपे. नेमकी प्रभावी माणसेच लक्ष्य का होतात? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समाजात अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतात, अनेक भ्रष्ट, अपयशी, अनैतिक लोक वावरत असतात, पण त्यांच्यावर फारशी टीका होत नाही. मग बोट का रोखले जाते ते नेहमी काम करणाऱ्यांवरच? कारण निष्क्रिय माणूस कुणाचाच शत्रू नसतो. तो व्यवस्थेला धोका नसतो. पण प्रभावी व्यक्ती ही व्यवस्थेच्या कमतरतांचा आरसा दाखवते. ती सांगते हे शक्य आहे, बदल होऊ शकतो. आणि ही शक्यता अनेकांच्या स्वार्थाला घातक ठरते. म्हणूनच बदनामीचा हेतू एकच असतो, विश्वास तोडणे. लोकांचा विश्वास ढळला, की प्रभाव आपोआप कमी होतो. काम कितीही चांगले असले, तरी संशयाची सावली पडली की समाज मागे सरकतो. इतिहासातील प्रत्येक परिवर्तनाची हीच कथा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत, महात्मा गांधी असोत, महात्मा फुले असोत किंवा आधुनिक काळातील कोणताही समाज परिवर्तनवादी, प्रत्येकाच्या वाट्याला बदनामी आलीच. कुणाला देशद्रोही ठरवले गेले, कुणाला धर्मविरोधी, कुणाला समाजविघातक, तर कुणाला सत्तालोलुप.

परंतु इतिहासाने एक गोष्ट स्पष्ट केली, बदनामी क्षणिक असते, प्रभाव टिकून राहतो. कारण बदनामी शब्दांवर उभी असते, तर प्रभाव कृतींवर. बदनामी ही अपयशाची कबुली असते. जेव्हा तुमच्या विचारांना तर्काने, तुमच्या कामाला पर्यायाने, आणि तुमच्या प्रश्नांना उत्तराने पराभूत करता येत नाही, तेव्हा शेवटचा उपाय म्हणजे व्यक्तीवर हल्ला. हा हल्ला म्हणजेच बदनामी. म्हणजेच बदनामी ही प्रत्यक्षात तुमच्या अपयशाची नाही, तर तुमच्या विरोधकांच्या अपयशाची कबुली असते. त्यांना तुमच्याशी वैचारिक लढाई जिंकता आली नाही, म्हणून त्यांनी चारित्र्यहननाचा मार्ग स्वीकारला. इथेच प्रभावी माणसाची कसोटी लागते. बदनामीला घाबरून तो माघार घेतो का? की सत्याच्या मार्गावर ठाम राहतो? अनेकजण इथेच थकतात. कारण बदनामी वेदनादायी असते. ती केवळ प्रतिमेवर नाही, तर मनावर, नात्यांवर आणि आत्मविश्वासावर आघात करते. पण जो माणूस स्वतःच्या हेतूंवर प्रामाणिक असतो, त्याला एक गोष्ट माहीत असते आज नाही, उद्या नाही, पण एक दिवस सत्य उघड होणारच. फक्त प्रभावी व्यक्तींनीच नाही, तर समाजानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण अफवांवर विश्वास ठेवतो का? अर्धसत्य स्वीकारतो का? की प्रश्न विचारतो? कारण बदनामी फोफावते ती प्रेक्षकांच्या मौनामुळे. जर समाज सजग झाला, विवेक वापरू लागला, तर बदनामीचे उद्योग आपोआप निष्प्रभ ठरतील. अन्यथा प्रत्येक नव्या विचाराचा गळा दाबला जाईल आणि समाज स्थैर्याच्या नावाखाली कुजत राहील.

म्हणूनच एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल की, क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे. ती भीतीदायक वाटू शकते, त्रासदायक असू शकते, पण ती तुमच्या अपयशाची खूण नाही; ती तुमच्या यशाची चाहूल आहे. इतिहास कधीही बदनामी करणाऱ्यांच्या नावाने ओळखला जात नाही; तो नेहमी प्रभाव टाकणाऱ्यांच्या नावाने लिहिला जातो. म्हणूनच बदनामीच्या गदारोळातही जेव्हा तुम्ही शांतपणे, ठामपणे आणि प्रामाणिकपणे काम करत राहता, तेव्हाच खरा परिवर्तनाचा अध्याय सुरू होतो. कारण शेवटी एकच सत्य उरते, बदनामीची वादळे थांबतात, पण प्रभावाची दिशा इतिहास ठरवतो.

**-प्रवीण बागडे,नागपूर**

साप्ताहिक माणदेश वार्ता
हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-१७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश



सांगोला : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छ सांगोला – हरित सांगोला या पर्यावरणपूरक उपक्रमाअंतर्गत लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा भाऊ माने यांच्या संकल्पनेतून महूद रोड येथील गणेश नगर परिसरात वृक्षारोपण करून काल गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती अत्यंत आगळ्या–वेगळ्या आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरी करण्यात आली. यावेळी सांगोला नगरपालिकाचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा भाऊ माने तसेच या परिसरातील नागरिकांच्या यांच्या शुभहस्ते विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी नगरसेवक काशिलिंग गावडे यांच्यासह गणेश नगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे, लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा भाऊ माने हे गेल्या १० वर्षांपासून सांगोला शहरात सातत्याने मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करत आहेत. सार्वजनिक जागा, रस्त्यांच्या कडेला, शाळा परिसर, मोकळी मैदाने तसेच नागरी वसाहतींमध्ये त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन हजारो रोपांची लागवड केली आहे. फक्त वृक्ष लावून थांबणे नव्हे, तर त्या वृक्षांचे संगोपन, संरक्षण आणि जतन यावरही त्यांनी नेहमी भर दिला आहे. लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंद माने यांनी दहा वर्षापासून पर्यावरण संवर्धनाची चळवळ सांगोल्यात रुजवली आहे.त्यांच्या या दीर्घकालीन प्रयत्नांमुळे आज सांगोला शहरात अनेक ठिकाणी हिरवळ वाढलेली दिसून येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी जलसंधारण, निसर्गरक्षण आणि स्वराज्याच्या संरक्षणासाठी किल्ले, वने, डोंगरदऱ्या व पर्यावरणाचे महत्त्व अत्यंत दूरदृष्टीने ओळखले होते. गड–किल्ल्यांवरील पाण्याची टाकी, पावसाचे पाणी अडवण्याची व्यवस्था, तसेच वनसंपत्तीचे जतन यामुळे शिवकालीन प्रशासन हे निसर्गाशी सुसंगत होते.याच विचारसरणीची प्रेरणा घेऊन लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा भाऊ माने यांनी स्वच्छ सांगोला – हरित सांगोला या पर्यावरणपूरक उपक्रमाची सुरुवात केली आहे.

केवळ विकास नव्हे तर निसर्गाचा समतोल राखून विकास ही संकल्पना या मुख्य भूमिका असून शिवजयंती म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर समाजहिताची प्रेरणा असावी, या विचारातून लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा माने यांनी वृक्षारोपणासारख्या उपक्रमाला प्राधान्य दिले. त्यांच्या या लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश सामाजिक हेतूच्या भूमिकेमुळे समाजासाठी उपयुक्त कामे करण्याची चळवळ अधिक बळकट होत आहे. वाढदिवसाचे औचित्य झाडांसाठी वापरा; नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने यांचे आवाहन सांगोला शहरातील नागरिकांना नगराध्यक्ष आनंदा भाऊ माने यांनी एक आगळेवेगळे व पर्यावरणपूरक आवाहन केले आहे.

वाढदिवस अथवा लग्नाचे वाढदिवसानिमित्त केक, हार–तुरे व अनावश्यक खर्च टाळून किमान दोन वृक्ष सांगोला नगरपालिकेला भेट देऊन स्वच्छ सांगोला – हरित सांगोला या पर्यावरण चळवळीत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात योगदान द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. नागरिकांनी भेट दिलेले वृक्ष नगरपालिकेमार्फत योग्य ठिकाणी लागवड करून त्यांचे संगोपन करण्यात येणार असून स्वच्छ, सुंदर आणि हरित सांगोला घडवण्यासाठी अशा उपक्रमांना नागरिकांनी सहकार्य करावे.

# सांगोला एसटी आगाराचा ९ लाख ९० हजारांचा नफा मिळवत जिल्ह्यात तिसरा क्रमांक




सांगोला : सांगोला एसटी आगाराने पुन्हा एकदा जिल्ह्यात तिसरा क्रमांक राखून ठेवला आहे. डिसेंबर नंतर जानेवारी महिन्यात ९ लाख ९० हजारांचा नफा मिळवत पुन्हा जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवला असल्याची माहिती सांगोला एसटीआगार प्रमुख विकास पोफळे यांनी दिली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये विविध मार्गांवर केलेल्या फेऱ्यांमधून ४ कोटी ६ लाख ३८ हजार रुपयांचे एकूण उत्पन्न मिळवले होते. पैकी ४ कोटी २ लाख ४४ हजार रुपये खर्च झाले. यामधून खर्च वगळता सांगोला एसटी आगाराने डिसेंबर मध्ये ३ लाख ९४ हजारांचा नफा मिळवत सोलापूर जिल्ह्यामध्ये तिसरा क्रमांक मिळवला होता. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये विविध मार्गावर एसटी बसेस चालवून एकूण ३ कोटी ७५ लाख ६५ हजार रुपये उत्पन्न मिळवले. पैकी ३ कोटी ६५ लाख ७५ हजार रुपये खर्च झाले. यामधून निव्वळ नफा म्हणून ९ लाख ९० हजार रुपये सांगोला एसटी आगाराने मिळवत सोलापूर जिल्ह्यात पुन्हा एकदा तिसऱ्या क्रमांकावर आपले अस्तित्व कायम ठेवले आहे.

सोलापूर जिल्ह्यात मंगळवेढा क्रमांक एकवर आहे, कुर्डूवाडी एसटी बस स्थानक दुसरा तर सांगोला तिसरा आणि बार्शी एसटी बस स्थानक चौथा क्रमांक मिळवला आहे. उत्पन्नात आघाडी घेण्यासाठी सांगोला एसटी बस स्थानकाकडून प्रयत्न केला जात असून, ज्यादा बसेस उपलब्ध झाल्या तर उत्पन्नात देखील वाढ होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सांगोला एसटी बस स्थानकाकडे सध्या ५९ बसेस कार्यरत असून पैकी ३ एसटी बसेस सोलापूर डिव्हिजन येथे पाठवण्यात आले आहे. उर्वरित ५६ बसेसच्या माध्यमातून विविध मार्गांवर प्रति दिनी २९० फेऱ्या केल्या जातात. प्रवाशांना चांगली सुविधा देण्यासाठी आगाराकडे चालक व वाहक असे एकूण २५४ आहेत. चालक वाहकांची संख्या कमी असतानादेखील सांगोला एसटी आगाराने जिल्ह्यात उत्पन्नात आघाडी घेतली आहे.

एसटीची संख्या कमी असताना देखील आगाराने उत्पन्नात सातत्य ठेवले. सांगोला एसटी आगाराला नुकत्याच नवीन दहा बसेस उपलब्ध झाल्यामुळे चांगली सुविधा देणे सुरुवात झाली. याशिवाय डिसेंबर जानेवारी महिन्यात तालुक्याच्या ग्रामीण भागातील अनेक महाविद्यालय व शाळांच्या सहली कोकणात व मराठवाड्यात गेल्यामुळे या सहलीतूनही चांगले उत्पन्न मिळवले आहे. महिला सन्मान, अमृतमध्ये, शालेय विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिकांनी प्रवासाचा लाभ घेतला. आगाराने सध्या प्रवाशांच्या मागणीनुसार बसेसची सुविधा देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दर अमावास्येला सांगोलाआदमापूर , सांगोला आरेवाडी मार्गावर एसटी बसेसची व्यवस्था केल्याने शहर व तालुक्याच्या ग्रामीण भागातील बहुतांश भाविकांची आदमापूरच्या बाळूमामा आणि आरेवडी बिरोबा देवाची दर्शनाची सोय झाली आहे. तर रविवार – गुरुवार आणि पौर्णिमेला अक्कलकोट व गाणगापूर येथे जादा बसेस सोडण्यात येत आहेत. या गाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

अशा वेगवेगळ्या माध्यमातून उत्पन्नवाढीचे उपक्रम राबवल्यामुळे आगाराने उत्पन्नात झेप घेत जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवला असून, सध्या आगाराला आणखीन नवीन १५ बसेसची आवश्यकता आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपलब्ध करून दिल्यास आगारामध्ये आणखीन चांगल्या पद्धतीची सुविधा देता येणार आहे. असेही सांगोला आगार प्रमुख विकास पोफळे यांनी सांगितले आहे.



# विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी जवळा गावाने घेतला ऐतिहासिक निर्णय
# २५ फेब्रुवारी पासून सायं. ७ ते रात्री ९ पर्यंत जवळा गावातील मोबाईल आणि टीव्ही पूर्णपणे बंद




सांगोला : सध्या देशभरातील तरुण पिढी बरोबरच लहान मुले महिला आणि अगदी वयोवृद्ध व्यक्तींनाही मोबाईल आणि टीव्हीचे जणू व्यसन लागले आहे. मोबाईलच्या आहारी गेल्याने शालेय विद्यार्थ्यांचे भवितव्यच अंधारात जात असल्याने येणाऱ्या २५ फेब्रुवारी पासून दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत जवळा ता. सांगोला या गावातील मोबाईल आणि टीव्हीसह अन्य डिजिटल स्क्रीन पूर्णपणे बंद ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय युवा नेते ॲड यशराजे साळुंखे पाटील यांच्या संकल्पनेतून जवळा गावचे सरपंच सज्जन मागाडे यांनी घेतला आहे.

सध्या स्मार्टफोनचा वापर विद्यार्थ्यांमध्ये झपाट्याने वाढत असून त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्य, अभ्यास आणि वर्तणुकीवर होत असल्याचे चित्र समोर येत आहे. लहान मुलांच्या आई सुद्धा आपले मुल रडत असल्यास त्याला गप्प बसविण्यासाठी मोबाईल देत आहे. त्यापासून आपली तात्पुरती सुटका होत असली तरी त्याचे दीर्घकालीन परिणाम लहान मुलांच्या जीवनावर होत आहेत. ऑनलाइन शिक्षण, सोशल मिडिया, व्हिडिओ गेम्स आणि मनोरंजनाच्या वाढत्या आकर्षणामुळे अनेक विद्यार्थी दिवसातील ५ ते ७ तास मोबाईलवर घालवत आहेत त्यामुळे त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे. ज्या वयात शिक्षणाचे आणि संस्काराचे धडे गिरवायला पाहिजे त्याच वयात शालेय मुले मोबाईच्या आहारी जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रतेचा अभाव, स्मरणशक्ती कमी होणे, अभ्यासात रस न उरणे अशा समस्या निर्माण होत आहेत. विशेषतः रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरल्याने झोपेचे चक्र बिघडते आणि त्याचा थेट परिणाम शारीरिक व मानसिक आरोग्यावर होतो. डोळ्यांचे विकार, मान- पाठदुखी, डोकेदुखी यांसारख्या तक्रारी वाढत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने येणाऱ्या पिढीचे होणारे संभाव्य नुकसान लक्षात घेऊन युवा नेते ॲड यशराजे साळुंखे पाटील यांनी गावात सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत मोबाईल आणि टीव्ही बंद ठेवण्याची संकल्पना मांडली. या संकल्पनेनुसार सरपंच मागाडे यांनी उपसरपंच नवाज खलिफा सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील व्यापारी, महिला आणि ग्रामस्थांना विश्वासात घेऊन हा ऐतिहासिक निर्णय घेतला.

जवळा ग्रामस्थांनी घेतलेल्या या स्तुत्य निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. शैक्षणिक गुणवत्ता आणि आरोग्य सुधारण्यास मदत होणार सोशल मिडियावरील आभासी जगामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिडचिडेपणा आणि आत्मविश्वास कमी होण्याच्या घटना वाढत आहेत. अनेक विद्यार्थ्यांना मोबाईलचे व्यसन लागल्याने त्यांचा स्वतःच्या आई, वडील आणि संपूर्ण कुटुंबीयांशी संवाद कमी झाला आहे. रात्री दोन ते तीन तास मोबाईल आणि अन्य डिजिटल स्क्रीन बंद केल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यास, रात्रीचे जेवण वेळेत पूर्ण होईल आणि त्यांना वेळेत झोप लागेल. परिणामी शैक्षणिक विकासाबरोबर त्यांचे आरोग्यही सुदृढ राहण्यास मदत होणार आहे.

जवळा गावाने घेतलेल्या या निर्णयाचे सांगोला तालुक्यातील इतर गावांनीही अनुकरण करावे,असे आवाहन ॲड यशराजे साळुंखे पाटील यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी लोक काय म्हणतील याकडे न पाहता आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करावे-ॲड.गजानन भाकरे

## शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

सांगोला : शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.गजानन भाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उपाध्यक्ष महादेव गायकवाड हे होते. तसेच संस्थेचे सचिव अंकुशराव गायकवाड व कॉलेजचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात अतिशय दिमाखदार पद्धतीने झाली. कॉलेजच्या प्रांगणात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यासमोर ढोल-ताशांच्या गजरात आणि शिवगर्जनांच्या जयघोषात महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांनी आपल्या प्रस्तावनेत महाराजांचे विचार व तत्त्वे यांवर मार्गदर्शन केले. जीवनातील प्रत्येक अडचणीवर मात करून त्यांनी आदर्श राज्यकारभार कसा उभा केला, याची उदाहरणांसह माहिती दिली. महाराजांचे विचार आजही नेतृत्व, व्यवस्थापन आणि राष्ट्रनिर्मितीसाठी प्रेरणादायी आहेत, असेही प्राचार्यांनी नमूद केले. उपाध्यक्ष महादेव गायकवाड यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मृदुला पाटील, सुरेखा लिगाडे व तनुजा मोरे या विद्यार्थिनींनी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे सादर केली.

प्रमुख पाहुणे ॲड. गजानन भाकरे यांनी आपल्या मनोगतात आचार, विचार आणि कृती यांची सांगड कशी घालावी, तसेच इतिहासाने ओळख घ्यावी असे कार्य आपल्या हातून घडले पाहिजे, यावर मार्गदर्शन केले. त्यांनी हिंदवी स्वराज्य या संकल्पनेचा उल्लेख करताना महाराजांचे शेतकऱ्यांवरील प्रेम, दूरदृष्टीपूर्ण निर्णय आणि मावळ्यांच्या कौशल्याची अचूक पारख यावर भाष्य केले. स्वराज्य निर्मितीसाठी अनेक मावळ्यांनी दिलेल्या बलिदानाची आठवण करून देत विद्यार्थ्यांनी लोक काय म्हणतील याकडे न पाहता आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करावे, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून महादेव गायकवाड यांनीही महाराजांविषयी गौरवोद्गार काढले. विद्यार्थ्यांनी महाराजांच्या धैर्य, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा या गुणांचा आदर्श ठेवून जीवनात मोठी उद्दिष्टे साध्य करावीत, असे आवाहनही त्यांनी केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.संदीप बावचे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# सांगोला तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांत मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

## खडांगळे हॉस्पिटलचा पुढाकार; शेकडो रुग्णांना मोफत औषधोपचार

सांगोला : येथील खडांगळे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने सांगोला तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाची 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' आणि केंद्र शासनाची 'आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर यशस्वीरीत्या पार पडले.तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने आयोजित केलेल्या या शिबिरात शेकडो रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात आली.




तपासणीनंतर गरजूंना तत्काळ मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले. तसेच, ज्या रुग्णांना पुढील उपचारांची किंवा शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे, अशा निवडक बाधित रुग्णांवर दोन्ही शासकीय योजनांतर्गत खडांगळे हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार करण्यात आले आहेत. खडांगळे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये गोर-गरीब व गरजू रुग्णांकरिता शासनाच्या विविध आरोग्य योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत.

तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाच्या करण्यात आले आहे.

जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मो.प्र.-१ दिनांक-१८/१०/२०२३

**परिशिष्ट-४**

**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्रमांक २, सोलापूर यांचे कार्यालय मोहिते नगर, आयकर भवन शेजारी, होटगी रोड, सोलापूर-४१३००३

दूरध्वनी क्रमांक - ०२१७-२७४०६६० ई-मेल - eebdd2solapur@gmail.com

**ई-निविदा सूचना क्रमांक ३३ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २, सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामा करीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) ब- १ निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatendenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदाबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम स्तरावर राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये कांही बदल होत असल्यास शासनाच्या https://mahatenderes.gov.in संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत रु. | जिल्हा |
|---|---|---|---|
| १. | उजनी डावा कालवा सा.क्र.१७/०१६ येथील कमान मोरी जवळील निचरा चारीची दुरुस्ती व कमान मोरीच्या बाजुस पोहोच रस्ता करणे | रु.३९,३२,४११/- | सोलापूर |

१. ई-निविदा उपलब्ध कालावधी :- **दि.१८.०२.२०२६ ते दि.२५.०२.२०२६**
२. ई-निविदा उघडण्याचा दिनांक: **दि. २७.०२.२०२६ रोजी सकाळी १०:०० वा.** (तांत्रिक लिफाफा)

जा.क्र. भीविवि-२/लेशा-४/५२०/२०२६.
भीमा विकास विभाग क्र.२,
सोलापुर दि.१३.०२.२०२६.

जिमाका / सो / जाहि /३२३/२०२५-२६

सही/-
**(प्र.पां. कडुसकर)**
कार्यकारी अभियंता
भीमा विकास विभाग क्र.२,
सोलापूर